# आले

**जमीन** : मध्यम ते हलकी पाण्याचा चांगला निचरा होणारी असावी.

**पूर्वमशागत** : उभ्या -आडव्या दोन खोल नांगरटी, ढेकळे फोडणे, कुळवणे इ.

**सुधारित वाण** : माहिम, रिओ-डी-जानेरो, कालीकत, महिमा, वरदा

**पेरणी** : एप्रिल महिन्याच्या शेवटच्या आठवड्यापासून मे महिन्याअखेर.

**बियाणे** : २५ ते ४५ ग्रॅम वजनाचे डोळे फुगलेले, १८ ते २० क्विंटल बियाणे प्रति हेक्टर.

**बीजप्रक्रिया** : क्विनॉलफॉस २५ ईसी (२० मि.ली.) १० लि. पाण्याच्या द्रावणात बियाणे २० मिनिटे बुडवून लागवडीस वापरावे.

**खते** : शेणखत ५० ते ८० बैलगाड्या पूर्वमशागतीचे वेळी मातीत मिसळून द्यावे. नत्र १२० किलो प्रति हेक्टरी तीन समान हप्त्यात लागवणीनंतर पहिला हप्ता दीड महिन्यांनी त्यानंतर दुसरा व तिसरा हफ्ता एक एक महिन्याचे अंतराने द्यावा. स्फुरद ७५ किलो व पालाश ७५ किलो प्रति हेक्टर लागवडीपूर्वी वाफ्यात पसरून द्यावे.

**भरखते** : हेक्टरी २ टन निंबोळी किंवा करंजी पेंड आल्याची उटाळणी करतेवेळी लागवडीनंतर २.५ ते ३ महिन्यांनी वापरावी.

**आंतरमशागत** : आवश्यकतेनुसार ३ ते ४ खुरपण्या कराव्यात. जमीन जास्त तुडवली जाणार नाही याची दक्षता घ्यावी.

**पाणी व्यवस्थापन** : जमिनीचे मगदुरानुसार ८ ते १० दिवसाच्या अंतराने पाण्याच्या पाळ्या द्याव्यात. ठिबक किंवा तुषार सूक्ष्म सिंचन पद्धतीचा वापर केल्यास उत्पादन वाढते.

**काढणी** : लावणीनंतर ८ ते १० महिन्यांनी पाने पिवळी पडल्यावर किंवा वाळल्यावर कुदळीच्या सहाय्याने खांदणी करून काढणी करावी.

**उत्पादन** : १५ ते २० टन / हेक्टर.